पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १४०**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - ०५/११/२०१४ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मास्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ०५/११/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.महेशदादा किसन लांडगे - सभापती
२) मा.वाघेरे सुनिता राजेश
३) मा.लोंढे गणेश नारायण
४) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
५) मा.शेंडगे आशा सुखदेव
६) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
७) मा.गायकवाड संध्या सुरदास
८) मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापु
९) सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
१०) मा.तरस बाळासाहेब जयवंत
११) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
१२) अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
१३) मा.प्रसाद शेट्टी

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.डोईफोडे,मा.दंडवते, मा.गावडे, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.माछरे - सहा. आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.पाटील, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.डॉ. अनिल रॉय-आरोग्य वैदयकिय अधिकारी, मा.डॉ.मनोज देशमुख-वैद्यकीय अधिक्षक, मा.पवन साळवे-अति.वैदय. अधिकारी, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.दुधेकर,मा.निकम,मा.इंगळे,मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी,मा.पिरजादे, मा.बरशेट्टी,मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी,मा.कांबळे, मा.शेख-कार्यकारी अभियंता, मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.सातव- प्र.शिक्षण अधिकारी (माध्यमिक), मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार, मा.बोदाडे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -</u>**

विषय क्रमांक ३८):- आर्थिक मदत करणेबाबत-मा.सुनिता गवळी,मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३९):- मा.उपमहापौर कार्यालयासाठी वाहन खरेदी करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४०):- ठराव रद्द करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४१):- सन २०१४-१५ अंदाजपत्रकातील झोनिपु विभागातील कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करुन तरतुद वर्ग करणेबाबत-मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४२):- तरतूद वर्गीकरण करणेबाबत-मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४३):- सन २०१४ बोनस, सानुग्रह अनुदान व दरमहाचे वेतन/भत्ते मिळणेबाबत-मा.सुनिता वाघेरे, मा.विनायक गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४४):- तरतुद वर्गीकरण करणेबाबत-मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४५):- मनपाच्या माध्यमिक विद्यालयांतील विद्यार्थ्यांना पी.टी गणवेष पुरविणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४६):- तरतुदीत फेरबदल करणेबाबत-मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४७):- संजीवन समाधी सोहळ्याची व्यवस्था करणेबाबत-मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४८):- क प्रभाग व क मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४९):- प्र.क्र.४१ मध्ये ठिकठिकाणी नाला ड्रेनिंग व दुरुस्ती करणेबाबत - मा.सदगुरु कदम, मा.विनायक गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५०):- प्र.क्र.१७ मधील रस्टन कॉलनी ते आकुर्डी येथील नाल्यापर्यंत पावसासाठी, पाण्यासाठी पाईपलाईन टाकणेबाबत...

विषय क्रमांक ५१):- मा.स्थायी समिती ठराव दुरुस्ती करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५२):- मुख्य प्रशासकीय इमारतीचे आवारातील कॅंटीन भाड्याने देणेबाबत - मा.सुनिता गवळी, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५३):- सांगवी प्र.क्र.५९ मधील रस्ते विकसीत करणेबाबत - मा.अतुल शितोळे, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५४):- कै.गजानन म्हेत्रे उद्यान व मैदान देखभाल दुरुस्तीचे कामाबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५५):- मौजे-तळवडे रुपीनगर प्र.क्र. १मध्ये विकास कामांना तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५६):- हद्दीबाहेर नवीन नळ कनेक्शन मिळणेबाबत-मा.सुनिता गवळी, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५७):- वैद्यकीय उद्योग धंदा परवाना फी बाबत - मा.शांताराम भालेकर, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५८):- व्यायामशाळा सेवा शुल्क तत्वावर देखभाल संरक्षण चालनकामी देण्याबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५९):- मानधनावरील कर्मचा-यांना एकत्रित अनुदान देणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता वाघेरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ६०):- ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ६१):- ठ.क्र. ८२३७ मध्ये दुरुस्ती करणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

----------

ठराव क्रमांक -९००१ विषय क्रमांक - १

दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -झोनिपु स्थापत्य

सुचक - मा.सुनिता वाघेरे अनुमोदक - मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२११७/१४ दि.२०/१०/२०१४

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झो.नि.पु. स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१४-१५ मधील अ.क्र.६३ अन्वये, प्रभाग क्र.६२ मधील संजय गांधीनगर झोपडपट्टी मधील स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.नंदेश्वरी कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रु.९,३२,८४०/- (अक्षरी र.रु.नऊ लाख बत्तीस हजार आठशे चाळीस) पेक्षा ३८.५०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा दर मंजुर दराने र.रू.५,७३,६९७/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असून एजन्सीस कामाचा आदेश दिलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -९००२ | विषय क्रमांक - २

दिनांक - ०५/११/२०१४ | विभाग - झोनिपु स्थापत्य

सुचक - मा.संगिता भोंडवे | अनुमोदक - मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२१२०/१४ दि.२०/१०/२०१४

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झो.नि.पु. स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१४-१५ मधील अ.क्र.७८ अन्वये, प्रभाग क्र.४२ मधील बौध्दनगर झोपडपट्ट्या मध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.हर्ष एन्टरप्रायजेस (नि.र.रु.९,३२,८४०/- (अक्षरी र.रु.नऊ लाख बत्तीस हजार आठशे चाळीस) पेक्षा ४०.००% कमी) या ठेकेदाराकडून निविदा दर मंजुर दराने र.रू.५,५९,७०४/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असून एजन्सीस कामाचा आदेश दिलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -९००३ | विषय क्रमांक - ३

दिनांक - ०५/११/२०१४ | विभाग - झो.नि.पु. स्थापत्य

सुचक - मा.रमा ओव्हाळ | अनुमोदक - मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२११९/१४ दि.२०/१०/२०१४

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झो.नि.पु. स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१४-१५ मधील अ.क्र.५४ अन्वये, प्रभाग क्र.४३ मधील शास्त्रीनगर झोपडपट्ट्यामध्ये स्थापत्य विषयक कामांची दुरुस्ती करणेकामी मे.निलेश कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.९,३२,८४०/- (अक्षरी र.रु.नऊ लाख बत्तीस हजार आठशे चाळीस) पेक्षा ३९.८९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा दर मंजुर दराने र.रू.५,६०,७३०/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असून एजन्सीस कामाचा आदेश दिलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -९००४ | विषय क्रमांक - ४

दिनांक - ०५/११/२०१४ | विभाग - झो.नि.पु. स्थापत्य

सुचक - मा.शांताराम भालेकर | अनुमोदक - मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२१२१/१४ दि.२०/१०/२०१४

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झो.नि.पु. स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१४-१५ मधील अ.क्र.५९ अन्वये, प्रभाग क्र.४३ मधील मिलिंदनगर झोपडपट्ट्यामध्ये स्थापत्य विषयक कामांची दुरुस्ती करणेकामी मे.निलेश कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.९,३२,८४०/- (अक्षरी र.रु.नऊ लाख बत्तीस हजार आठशे चाळीस) पेक्षा ३९.८९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा दर मंजुर दराने र.रू.५,६०,७३०/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असून एजन्सीस कामाचा आदेश दिलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -९००५ विषय क्रमांक - ५
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग - झोनिपु स्थापत्य
सुचक - मा.बाळासाहेब तरस अनुमोदक - मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२११८/१४ दि.२०/१०/२०१४

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झो.नि.पु. स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१४-१५ मधील अ.क्र.४५ अन्वये, चिंचवड येथील झोपडपट्ट्यामधील मनपा शौचालयाची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.दिपक बाळकृष्ण जाधव (नि.र.रु.९,३३,५९०/- (अक्षरी र.रु.नऊ लाख तेहतीस हजार पाचशे नव्वद) पेक्षा ३७.५०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा दर मंजुर दराने र.रू. ५,८३,४९४/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असून एजन्सीस कामाचा आदेश दिलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -९००६ विषय क्रमांक - ६
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -आरोग्य,ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक - मा.अतुल शितोळे अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.बक्षेका/५/कावि/६९२/१४ दि.१७/१०/२०१४

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालय परिसरात संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छतेवर आधारित पथनाटय सादरीकरणाबाबत शाहीर बाळासाहेब मालुसकर, सांगवी, पुणे-२७. यांची संस्था कलाछंद पुणे यांचे मार्फत होणा-या पथनाटयाचे प्रयोग ब क्षेत्रीय कार्यालयातील एकुण ११ प्रभागामध्ये प्रत्येकी १ प्रयोग याप्रमाणे ११ प्रयोग करणेत आलेले आहे. त्यासाठी प्रति प्रयोग/कार्यक्रम र.रु.५०००/- प्रमाणे र.रु.५५०००/- इतका खर्च झालेला आहे. सदरचे काम थेट पध्दतीने करारनामा न करता करुन घेवून व खर्च ‘ब’ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागाकडील “संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छता मोहीम” या लेखाशिर्षातून खर्च करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९००७ विषय क्रमांक - ७
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -लेखा
सुचक - मा.सुनिता वाघेरे अनुमोदक - मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/१६३१/१४ दि.२०/१०/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यापुर्वी मे.जनवाणी यांनी अंदाजपत्रकात सहभागाबाबत कामकाज केलेले आहे. परंतू त्यांना खर्चाची रक्कम अदा केलेली नाही. सन २०१५-१६ या वर्षी रक्कम अदा करावयाची झाल्यास मा. स्थायी समितीचे मंजूरीने अदा करणे शक्य होईल. मा.संगणक अधिकारी यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार मे. जनवाणी, पुणे यांना र.रु.६०,०००/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९००८ विषय क्रमांक - ८
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -इ क्षेत्रीय कार्यालय
सुचक - मा.संगिता भोंडवे अनुमोदक - मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.इक्षेका/६/कावि/४५९/१४ दि.१८/१०/२०१४

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/७२-२०१४-१५ मधील अ.क्र.१५ अन्वये, प्रभाग क्र.३२ सँडविक कॉलनी मधील सत्यनारायण सोसायटी व नुरमोहल्ला, संत तुकारामनगर इत्यादी ठिकाणी स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.चौधरी कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.७,५०,०००/- (अक्षरी र.रु.सात लाख पन्नास हजार) पेक्षा ३८.५०% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९००९ विषय क्रमांक - ९
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -मध्यवर्ती भांडार
सुचक - मा.रमा ओव्हाळ अनुमोदक - मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.सह आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/२०/कावि/१९०/१४ दि.२७/१०/२०१४

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे क्रीडा विभागास खेळाडू दत्तक योजना अंतर्गत गणवेश व आवश्यक विविध क्रीडा साहित्य खरेदीकामी ई.नि.सु.क्र.७/१/२०१४-१५ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविण्यात आले होते. त्यामधील लघुत्तम निविदाकार मे.भारती एंटरप्रायजेस यांचे आवश्यक क्रीडा साहित्य खरेदीकामी ३० बाबी र.रु.३,४५,४००/- व मे.सुमीत स्पोर्टस अँण्ड फिटनेस यांचे ५ बाबी र.रु.१९,७५८/- असे एकुण र.रु.३,६५,१५८/- दर स्विकृत करुन सदर पुरवठाधारकांकडून कराख़ामा करुन घेणेत आलेला असल्याने तसेच पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेले असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहीती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०१० विषय क्रमांक - १०
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -मध्यवर्ती भांडार
सुचक - मा.शांताराम भालेकर अनुमोदक - मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.सह आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/२०/कावि/१८९/१४ दि.२७/१०/२०१४

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

औ.प्र.केंद्र मोरवाडी व कासारवाडी येथे होणा-या अखिल भारतीय व्यवसाय परिक्षा बिल ऑफ मटेरियलचे साहित्य खरेदीबाबत अल्पमुदतीची ई.नि.सु.क्र.१४/२०१४-१५ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविण्यात आले होते. त्यामधील लघुत्तम निविदाकार मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स यांचे एकूण १४१ बाबींचे दर र.रु.२,७५,६९३/- दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. तसेच मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स यांनी करारनामा करुन दिलेला असल्याने त्यांना पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेले आहेत. प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहीती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०११ विषय क्रमांक - ११
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -उद्यान/वृक्षसंवर्धन
सुचक - मा.बाळासाहेब तरस अनुमोदक - मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/२६२/१४ दि.२७/१०/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे उद्यान/वृक्षसंवर्धन विभागाकडील निनो.क्र.७/२०१४-१५ अन्वये, मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील मोठया झालेल्या वृक्षांचे पिंजरे काढून दुरूस्त करून पुरविण्कामी मे.शुभम उदयोग (नि.र.रू.१५,९०,५९०/- (अक्षरी र.रू.पंधरा लाख नव्वद हजार पाचशे नव्वद) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकीय ही सर्वात कमी दराची निविदा (प्रति नग दुरूस्ती र.रू.३२४/-) स्विकृत करणेत आली असून त्यांचेशी करारनामा करून घेणेस व प्रस्तुतकामी ५ महिने कालावधीसाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०१२ विषय क्रमांक - १२
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग-यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सुचक - मा.अतुल शितोळे अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/पीजी-१/कावि/७८२/१४ दि.२७/१०/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामध्ये नेत्ररोग विभागामध्ये मानसेवी तज्ञ पदावर तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्यासाठी मानधनावर र.रू.१,०००/- वर डॉ.वैशाली एम. साठे नेत्ररोग तज्ञ यांना मानधनावर मानसेवी तज्ञ म्हणुन नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०१३ विषय क्रमांक - १३
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक - मा.सुनिता वाघेरे अनुमोदक - मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/३४९/१४ दि.२७/१०/२०१४
विषय - मनपाच्या अ, ब, क व ड प्रभागातील मैलाशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करणे व आवश्यकतेनुसार नविन मशिनरी बदलणेबाबत...

विषय क्रमांक १३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०१४ विषय क्रमांक - १४
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -प्रशासन
सुचक - मा.संगिता भोंडवे अनुमोदक - मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१५/कावि/६६१/१४ दि.२७/१०/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना सन १९७९-८० पासून शासन निर्णयाच्या आधारे महानगरपालिका ठराव व स्विकृत धोरणानुसार घरबांधणी, भुखंड, घरदुरुस्ती, घरविस्तार अग्रिम दिले जात आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन

निर्णय क्रमांक घबांअ-१०.११/ प्र.क्र.५६/२०११/विनियम मंत्रालय, मुंबई-४०००३२. दिनांक २७ फेब्रुवारी २०१२ व मा.महापालिका समिती ठराव क्रं.८० दि.०१/०९/२०१२ अन्वये सुधारीत वेतनबँड मधील वेतन (मुळवेतन+ग्रेडवेतन) विचारात घेऊन अग्रिम रकमेत तसेच घराच्या किंमत मर्यादेत खाली नमुद केलेप्रमाणे सुधारणा केली आहे. महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग १ ते ४ मधील अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिमाची कमाल मर्यादा र.रु.२०,००,०००/-, घरविस्तार अग्रिम र.रु.४,००,०००/-, घरदुरुस्ती अग्रिम र.रु.२,००,०००/- व भुखंड खरेदी र.रु.४,००,०००/- तसेच घरबांधणी व इतर अग्रिमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता दिलेली असलेने प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.०१/०१/२०१३ चे परिपत्रक निर्गत केले आहे. त्यानुसार घरबांधणी अग्रिम मंजुरीचे धोरण राबविले जात आहे. तसेच परिपत्रक क्रं.प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.०१/०१/२०१३ मध्ये नमुद केलेली अट क्र.१ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती परिपत्रक क्रंप्रशा/११/कावि/१३८/२०१३ दि.२९/०१/२०१३ अन्वये बदल करणेत आलेला आहे.

**मुळ अट-** महानगरपालिका आस्थापनेवरील ज्या अधिकारी/कर्मचारी यांची नियमित वेतनश्रेणीत सलग ०५ वर्ष सेवा पूर्ण झाली आहे, अशा अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील.

**सुधारीत अट**- महानगरपालिका आस्थापनेवरील ज्या अधिकारी/कर्मचारी यांची नियमित वेतनश्रेणीत सलग ०३ वर्ष सेवा पूर्ण झाली आहे, अशा अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील. मात्र सदर अटीमध्ये दुरुस्ती करणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभा यांची मान्यता घेणेत आलेली नाही. सदर अटीस मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेची दि.२९/०१/२०१३ पासून कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक वाटते. सदर शासन निर्णयामध्ये घरबांधणी अग्रिम मंजूर करताना एकूण १४ अटी नमूद केल्या आहेत. त्यापैकी अट क्र.६ मध्ये अर्जदाराची स्वतःच्या नावावर घर/जमिन भारतात कोठेही असले तरी घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय असल्याचे नमुद केले आहे. तथापि या संदर्भात महापालिका ठराव क्र.४६७४, दिनांक ११/०६/२००२ नुसार परिपत्रक क्रमांक प्रशा/११/कावि/१०९/२००३, दिनांक १०/०३/२००३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतच फलॅट खरेदी/घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील तिच अट प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.०१/०१/२०१३ चे परिपत्रकात नमूद केली आहे. यापूर्वी घरबांधणी अग्रिम मंजुरीसाठी अंतर मर्यादा वाढविणेकामी महापालिका सभा ठराव क्र.१४१३ दि.०८/०३/१९९०, ठराव क्र.३८७५ दिनांक १९/०९/१९९८ व ठराव क्रं.४१४४ दि.२८/१०/१९९९ नुसार मान्यता घेणेत आलेली आहे. मा.आयुक्त व महासंघ यांचे मधील दि.२४/०७/२०१४ चे बैठकीमध्ये विषय क्र.१५ नुसार मा. आयुक्त यांनी घरबांधणी कर्जाकरीता मनपा हद्दीपासून २० कि.मी. अंतरापर्यंत बदलासाठी प्रस्ताव करणेस सुचविले आहे. त्यास अनुसरुन तसेच घरबांधणी/भूखंड/घरदुरुस्ती व घरविस्तार अग्रिम परिपत्रक क्रं.प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.०१/०१/२०१३ मधील अट क्र.६ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करणेत आवश्यक आहे

**मुळ अट** - पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हद्दीतच घर/फ्लॅट खरेदीसाठी घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील. तसेच सदरचे घर/फलॅट अर्जदाराच्या स्वत:चे नावे असणे आवश्यक राहील.

**सुधरित अट**--पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीपासून २० कि.मी. अंतरापर्यंत घर/फ्लॅट खरेदीसाठी घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील. तसेच सदरचे घर/फलॅट अर्जदाराच्या स्वत:चे नावे असणे आवश्यक राहील. सबब, परिपत्रक क्रं.प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.०१/०१/२०१३ मध्ये नमुद केल्यानुसार उपरोक्त घरबांधणी व इतर अग्रिमासाठी सुचविलेल्या अटीमधील अट क्र. १ व ६ मध्ये सुधारणा करणेस तसेच ज्या अधिकारी/कर्मचारी यांची नियमित वेतनश्रेणीत मा.आयुक्त यांची मागणी ३ वर्षे असलीतरी सलग २ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे अशा कर्मचा-यांस घरबांधणी अग्रीम अनुज्ञेय करण्यास तसेच घरबांधणी अग्रिमाची कमाल मर्यादा र.रु. २०,००,०००/- ऐवजी र.रु.२५,००,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये

पंचविस लाख फक्त) करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा मामहापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०१५ विषय क्रमांक - १५

दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -आरोग्य मुख्य कार्यालय

सुचक - मा.अतुल शितोळे अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/४६५/१४ दि.२७/१०/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका "ड" क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील कचरा उचलणे व वाहतुक करुन भोसरी कचरा स्थानांतरण केंद्र अथवा मोशी कचरा डेपो येथे टाकणे कामासाठी नि.नो.क्र.४-२/२०१३–१४ नुसार ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. लघुत्तम दराचे निविदाधारक मे.जय गणेश एन्टरप्रायजेस, पिंपरी-१७ यांची मा.स्थायी समिती ठराव क्र.७९७२ दिनांक २५/८/२०१४ नुसार १२ महिने कालावधीसाठी (१) कचरा स्थानांतर केंद्र प्रति वाहन प्रतिदिन २ खेपांसाठी र.रु.४,०६०/- व (२) मोशी कचराडेपो प्रति वाहन प्रतिदिन २ खेपांसाठी र.रु.४,२४०/- या दराने ९ वाहने प्रतिदिनी पुरविणेकामी कामाचा करारनामा करणे व याकामी येणा-या खर्चास मा.स्थायी समितीने मान्यता दिली आहे. करारनामा अट क्र.३० नुसार या कामासाठी जादा वाहनांची आवश्यकता असल्यास मान्य दरामध्ये ठेकेदार यांनी जादा वाहने उपलब्ध करुन देणेची अट / तरतूद आहे. त्यानुसार "ब" क्षेत्रीय कार्यालयाकडे १ व "ड" क्षेत्रीय कार्यालयाकडे २ अशा एकूण ३ जादा वाहनांची आवश्यकता आहे. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील जादा वाहनांची मागणी विचारात घेता सदर ठेकेदाराचे उर्वरीत ९ महिने कालावधीत ३ जादा वाहने उपलब्ध करणे व याकामी येणा-या अंदाजे र.रु.३८,६६,८८०/- (अक्षरी र.रू. अडोतीस लाख सहासष्ट हजार आठशे ऐंशी) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०१६ विषय क्रमांक - १६

दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -आरोग्य मुख्य कार्यालय

सुचक - मा.शांताराम भालेकर अनुमोदक - मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आ.मु.का./२/कावि/७०४/१४ दि.२७/१०/२०१४

विषय - मोकळया/रिकाम्या प्लॉटमधील स्वच्छतेसाठी होणा-या खर्चाचे वसुलीबाबत...

विषय क्रमांक १६ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०१७ विषय क्रमांक - १७

दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -स्थापत्य

सुचक - मा.बाळासाहेब तरस अनुमोदक - मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/कावि/५२८/१४ दि.२९/१०/२०१४

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२०१४-१५ मधील अ.क्र.६ अन्वये, प्रभाग क्र.४९ साई मंदीर बापुजीबुवा येथील परिसरातील रस्त्यावरील ट्रेंचेस, खड्डे, चर खडीमुरुम व बीबीएम पध्दतीने दुरुस्त करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू. ११,०८,०२५/- (अक्षरी र.रू.अकरा लाख आठ हजार पंचवीस) पेक्षा ७.३०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१०,७८,४९६/- पर्यंत काम करुन

घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा /वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०१८ विषय क्रमांक - १८

दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -स्थापत्य

सुचक - मा.अतुल शितोळे अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/कावि/५२९/१४ दि.२९/१०/२०१४

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२०१४-१५ मधील अ.क्र.१५ अन्वये, आरक्षण क्र.२३३ मधील मैदानाच्या आरक्षणाच्या जागी मैदान विकसीत करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.१४,००,००४/- (अक्षरी र.रू.चौदा लाख चार) पेक्षा ७.३० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१३,६२,६९४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा /वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०१९ विषय क्रमांक - १९

दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -स्थापत्य

सुचक - मा.सुनिता वाघेरे अनुमोदक - मा.गणेश लोंढे

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/कावि/५३०/१४ दि.२९/१०/२०१४

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२०१४-१५ मधील अ.क्र.१८ अन्वये, सन २०१४-१५ करिता प्र.क्र.४२ भाटनगर येथे रस्त्यांमधील ट्रेंचेस, क्रॉसकट खड्डे बुजविणे कामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.११,१५,६९२/- (अक्षरी र.रू.अकरा लाख पंधरा हजार सहाशे ब्यान्नव) पेक्षा ३.१०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.११,३५,१६१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०२० विषय क्रमांक - २०

दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -मुख्यलेखापरिक्षक

सुचक - मा.संगिता भोंडवे अनुमोदक - मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/१०३/१४ दि.२९/१०/२०१४

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे ऑगस्ट २०१४ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -९०२१ विषय क्रमांक - २१
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -मुख्यलेखापरिक्षक
सुचक - मा.रमा ओव्हाळ अनुमोदक - मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/१०४/१४ दि.२९/१०/२०१४

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.८.९.२०१४ ते दि.१४.९.२०१४ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१०४/२०१४ दि.२९.९.२०१४ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०२२ विषय क्रमांक - २२
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -विद्युत मुख्य कार्यालय
सुचक - मा.शांताराम भालेकर अनुमोदक - मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/५५४/१४ दि.२८/१०/२०१४

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निनो.क्र.७/२०१३-१४ मधील अ.क्र.३२ अन्वये, प्रभाग क्र.२९ इंद्रायणीनगर मधील नविन होणा-या प्रभाग कार्यालयात (ग्रोथ लॅब) इमारतीमध्ये विद्युत विषयक कामे करणेकामी मे.श्री.स्वामी समर्थ इलेक्ट्रीकल कॉर्पोरेशन (नि.र.रू.१३,०६,९५७/- [अक्षरी र.रू.तेरा लाख सहा हजार नऊशे सत्तावन्न] पेक्षा १६.५५ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०२३ विषय क्रमांक - २३
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -विद्युत मुख्य कार्यालय
सुचक - मा.बाळासाहेब तरस अनुमोदक - मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/५४९/१४ दि.२८/१०/२०१४

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निनो.क्र.७/२०१३-१४ मधील अ.क्र.३४ अन्वये, मनपा उपविभागातील प्र.क्र.२९ इंद्रायणीनगर येथील एम.आय.डी.सी. मधील रस्त्यावरील स्ट्रीट लाईटचे नूतनीकरण करणेकामी मे.यश इलेक्ट्रोलाईन (नि.र.रू. १३,०७,१८९/- [अक्षरी र.रू.तेरा लाख सात हजार एकशे एकोणनव्वद] पेक्षा १७.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०२४ विषय क्रमांक - २४
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -विद्युत मुख्य कार्यालय
सुचक - मा.अतुल शितोळे अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/५५०/१४ दि.२८/१०/२०१४

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निनो.क्र.७/२०१३-१४ मधील अ.क्र.३० अन्वये, प्रभाग क्र.३६ लांडेवाडीमधील उर्वरीत भागात LED फिटिंग बसवून नूतनीकरण करणेकामी मे.यश इलेक्ट्रो लाईन (नि.र.रू.५,६०,२२२/- [अक्षरी र.रू.पाच लाख साठ हजार दोनशे बावीस] पेक्षा ११.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०२५ विषय क्रमांक - २५
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग - विद्युत मुख्य कार्यालय
सुचक - मा.सुनिता वाघेरे अनुमोदक - मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/५५१/१४ दि.२८/१०/२०१४

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निनो.क्र.७/२०१३-१४ मधील अ.क्र.३ अन्वये, प्रभाग क्र.२९,३६,३७,३८ मध्ये विविध चौकात हायमास्ट दिवे बसविणे (एल ई डी फीटींग वापरून) कामी मे.यश इलेक्ट्रोलाईन (नि.र.रू.७,४६,९०९/- [अक्षरी र.रू. सात लाख सेहचाळीस हजार नऊशे नऊ] पेक्षा १.१३ % कमी ) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०२६ विषय क्रमांक - २६
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -विद्युत
सुचक - मा.संगिता भोंडवे अनुमोदक - मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/५५२/१४ दि.२८/१०/२०१४

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निनो.क्र.७/२०१३-१४ मधील अ.क्र.६ अन्वये, दिघी उपविभागांतर्गत मनपा इमारतीमध्ये विद्युत विषयक कामे करणेकामी मे.विमलाई इलेक्ट्रीक कॉर्पोरेशन ( नि.र.रू.१,८६,०००/- [अक्षरी र.रू. एक लाख शहाऐंशी हजार] पेक्षा १९.८१% कमी ) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०२७ विषय क्रमांक - २७
दिनांक - ०५/११/२०१४ विभाग -विद्युत
सुचक - मा.रमा ओव्हाळ अनुमोदक - मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/५५३/१४ दि.२८/१०/२०१४

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.७/२०१३-१४ मधील अ.क्र.२ अन्वये, प्र.क्र.७ च-होली फाटा ते च-होली रस्त्यावर LED दिवे बसविणेकामी मे.विमलाई इलेक्ट्रीक कॉर्पोरेशन (नि.र.रू.५,६०,२२२/- [अक्षरी र.रू. पाच लाख साठ हजार दोनशे बावीस] पेक्षा १७.९२ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -९०२८ विषय क्रमांक - २८
